**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** संजयनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0281  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/10/2025 00:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार  **Date From (दिनांक पासून):** 15/10/2025

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/10/2025

**Time From (वेळेपासून):** 10:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/10/2025  **Time (वेळ):** 23:43 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 041

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/10/2025 23:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 3 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र गहनिर्माण व क्षेतृ, पुणेगहनिर्माण व क्षेत्रविकास ,उपविभागीय कार्यालय, सांगली, 416416

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. योगेश रमेश चव्हाण

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, ,संजयनगर ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, ,संजयनगर ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8108601919

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. विजय यशवंत गंगाधर | | | 1. मु पो साखराळे,, ता वाळवा, इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 15.10.2025

मी श्री. योगेश रमेश चव्हाण, वय - 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.नं. 8108601919

सरकारतर्फे फिर्यादी होवुन देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर वरील कार्यालयात कार्यरत आहे.

दि. 14/10/2025 रोजी दुपारी 15.00 वा चे सुमारास मी कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे कक्षामधून बोलावून घेवून तक्रारदार श्री. निखील जगन्नाथ आठवले, रा.हडको कॉलनी सांगली यांची ओळख करून देवून त्यांची शिपाई म्हाडा कार्यालय सांगली यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेचे सांगून तक्रारदार यांची तक्रारीबाबत पुढील कारवाई करणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार निखील आठवले यांचे तक्रारी ऐकून घेवून त्यांचे तक्रारीबाबत उदईक दि.15/10/2025 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित करून तक्रारदार यांना उदईक दि.15/10/2025 रोजी सकाळी 09.30 वा शासकीय विश्रामगृह विश्रामबाग येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि. 15/10/2025 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. सांगली शहर यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन पुरुष कर्मचारी यांची पंच सेवा इकडील कार्यालयात पाठवण्याबाबत विनंती करून पंच साक्षीदार यांचे मोबाईल क्रमांक प्राप्त करून त्यांना 09.15 वा एसीबी कार्यालय येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्यानंतर काही वेळाने दोन्ही पंच 09.20 वा चे सुमारास एसीबी कार्यालय येथे आमचे समक्ष हजर झाले.

त्यावेळी मी दोन्ही पंचांना एका लोकसेवका विरुध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचांनी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/चौगुले, पोकॉ/पाटील, पोकॉ/जाधव, चालक रजपूत असे एसीबी कार्यालय सांगली येथून शासकीय बोलेरो वाहन क्र. एमएच 10 डीक्यु 9530 मधून 09.25 वा चे सुमारास सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक त्या साहित्यासह रवाना होवून शासकीय विश्रामगृह विश्रामबाग येथे 09.35 वा चे सुमारास पोलीस उप अधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांचे समक्ष दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार निखील आठवले हे देखील लागलीच शासकीय विश्रामगृह विश्रामबाग येथे आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर आम्ही श्री. शिवकांत महालिंग परवाज यांनी पंच नं.1 म्हणून व श्री. शशिकांत शहाजी कुंभार यांनी पंच नं. 2 म्हणून काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच साक्षीदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. तसेच सापळा पथकाचीही ओळख करून दिली.

त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. निखील आठवले यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार दोन्ही पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांनी त्यांचे म्हाडा घराचे लाईट व पाणी मीटरची एन.ओ.सी. देणेसाठी लोकसेवक शिपाई म्हाडा कार्यालय सांगली यांनी 1,000/- रूपये लाच मागत असलेची तक्रार सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. निखील आठवले यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. निखील आठवले यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात तक्रारी अर्ज लिहुन तो वाचुन त्याखाली तक्रारदार यांनी स्वाक्षरी करून अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये " मी निखील जगन्नाथ आठवले, वय 28, व्यवसाय - शिक्षण, रा. घर नंबर 12, व नंबर 13 पारीजात बंगला, हडको कॉलनी, अभयनगर, सांगली ता. मिरज, जि. सांगली या ठिकाणी

माझी आई सौ वनिता, वडील जगन्नाथ, बहिण कुमारी मिनल आठवले असे एकत्रात राहण्यास आहे. मी सद्या राहत असलेले सर्वे नं.255 मधील गाळा नं.13 चे म्हाडाचे घर मी श्री. शेखर पळसुले, रा. सांगली यांचेकडुन सन 2021 मध्ये खरेदी घेतले आहे. मी सद्या राहत असले घराचे वीज कनेक्शन व पाणी कनेक्शन माझे नावावर करणेसाठी मला म्हाडा कॉलनीचे कार्यालय म्हाडा कॉलनी, लक्ष्मी मंदिरजवळ, सांगली या कार्यालयाकडील ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

मी दिनांक 26/09/2025 रोजी म्हाडा कार्यालय, म्हाडा कॉलनी, लक्ष्मी मंदिरजवळ, सांगली येथे वीज कनेक्शन व पाणी कनेक्शन माझे नावावर करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला होता. माझे अर्जाची माहिती घेणेसाठी दिनांक 08/10/2025 रोजी सकाळी 11.00 वा. सुमारास मी म्हाडा कार्यालयात गेलो होतो.

त्यावेळी मी कार्यालयात उपस्थित शिपाई यांचेकडे माझ्या अर्जाची माहिती देवुन ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली. त्यावेळी सदर शिपाई यांनी माझेकडे ना हरकत प्रमाणपत्र देणेसाठी 1000/- रूपये रोख स्वरूपात लाचेची माझ्याकडे मागणी केली. तसेच लाच रक्कम 1000/- रूपये रोख स्वरूपात घेवुन येवुन ना हरकत प्रमाणपत्र घेवुन जा असे सांगीतले.

मी म्हाडा कार्यालयातील सदर शिपाई यांना लाच रक्कम 1000/- रूपये दिल्याशिवाय ते मला ना हरकत प्रमाणपत्र देणार नाहीत याची मला खात्री आहे. मला म्हाडा कार्यालयातील शिपाई यांना लाच देण्याची इच्छा नाही. तसेच मी आज त्यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे त्यावेळी नमुद शिपाई हे माझ्याकडे 1,000/- रुपये लाचेची मागणी करणार याची मला खात्री आहे.

माझा व म्हाडा कार्यालय सांगली येथील शिपाई यांचा कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच आमचेत कोणताही भांडण तंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती " अशी हकीकत नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. निखील आठवले यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर तक्रारी अर्ज वाचले बाबत तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

तक्रारदार यांनी लोकसेवक शिपाई म्हाडा कार्यालय सांगली यांचे काम करण्याचे ठिकाण हे म्हाडा कार्यालय, लक्ष्मी मंदीर चौक जवळ सांगली या ठिकाणी असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे म्हाडा कार्यालय, लक्ष्मी मंदीर चौक जवळ सांगली या ठिकाणी पडताळणी करण्याचे सर्वानुमते निश्चीत केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.

त्यानंतर मी 10.15 वा चे सुमारास माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. निखील आठवले व पंच क्र.1 शिवकांत परमाज यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 10.50 वा सुरु करुन तक्रारदार श्री. निखील आठवले यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून तक्रारदार व पंच नं.1 परमाज यांना लोकसेवक श्री. विजय गंगाधर, शिपाई म्हाडा कार्यालय यांची भेट घेणेकामी रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री.निखील आठवले हे त्यांचेकडील टीव्हीएस ज्युपीटर मो.सा. क्र. एमएच 10 सीपी 6499 वरून पंच नं.1 परमाज यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. निखील आठवले व पंच नं.1 परमाज असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 11.06 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. शिवकांत परमाज यांना, श्री.गंगाधर, शिपाई म्हाडा कार्यालय यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे शासकीय विश्रामगृह, विश्रामबाग येथुन तक्रारदार यांचेकडील मोटर सायकल वरुन रवाना होऊन सहयाद्रीनगर रेल्वे ब्रीज, मंगळवार बाजार मार्गे लक्ष्मी मंदीर चौकाजवळ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, सांगली असा भिंतीवर फलक लिहिलेल्या इमारतीजवळ दाखल झालो. तक्रारदार यांची त्यांची मो.सा. कार्यालयाचे बाहेर पार्क करून आम्ही पहिल्या मजल्यावरील कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी कार्यालयामध्ये विजय गंगाधर, शिपाई असे बोर्ड असले टेबलवर बसले इसमाजवळ तक्रारदार श्री. निखील आठवले यांनी जावून त्यांचे कामासंदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी लोकसेवक श्री. गंगाधर यांनी तक्रारदार यांना त्यांची कामाची एन.ओ.सी तयार झाली असल्याचे सांगितले. त्यावेळी

तक्रारदार यांनी "हयाच काय" असे विचारले असता गंगाधर, शिपाई यांनी तक्रारदार यांना "सांगितलय कि तुला आता परत-परत काय सांगायच आता" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "मला घरातन घ्यायला बर" असे म्हणाले. त्यावर गंगाधर यांनी "बघ तुझ्या हयनं मी सांगितलय तुला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "किती.........हजार रुपये?" असे विचारले असता लोकसेवक गंगाधर शिपाई यांनी "हा" असे बोलून "एक हजार रूपये रक्कम" घेणेचे मान्य केले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक गंगाधर शिपाई यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता गंगाधर शिपाई यांनी "तुज्या हेन दे" असे म्हणाले. त्यानंतर मी व तक्रारदार असे म्हाडा कार्यालय सांगली येथून रवाना होवून आपले समक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार निखील आठवले यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.1 परमाज यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. निखील आठवले व लोकसेवक श्री.विजय गंगाधर, शिपाई म्हाडा कार्यालय सांगली यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक शिपाई श्री.विजय गंगाधर यांनी तक्रारदार श्री. निखील आठवले यांचे म्हाडा घराचे लाईट व पाणी मिटरची एन.ओ.सी देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 1,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

तसेच लोकसेवक शिपाई श्री. विजय गंगाधर यांनी तक्रारदार यांना लागलीच लाच रक्कम घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही शिपाई श्री.विजय गंगाधर यांचेविरूध्द महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, लक्ष्मी मंदीर चौक जवळ सांगली येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.आठवले यांना विजय गंगाधर शिपाई यांनी लाच मागणी केलेप्रमाणे 1,000/- रूपये रक्कम हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचेकडील 500/- रूपये दराच्या एकुण 2 नोटा असे 1,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतल्या. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकात जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन 1,000/- रूपयांचा नोटांची घडी करून तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.आठवले, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी पथकातील पोशि/जाधव यांना शासकीय विश्रामगृह विश्रामबाग येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले.

त्यानंतर मी, त त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले. त्यानंतर मी 11.43 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन घेतले.

त्यानंतर मी, तक्रारदार व पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचे मोबाईलवर लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री.विजय गंगाधर, शिपाई यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर कार्यालयाचे बाहेर येवून हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.59 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे तक्रारदार श्री.आठवले यांचे गळयामध्ये लेसच्या सहयाने अडकवून शर्टच्या आतमध्ये सोडून तक्रारदार व पंच नं.1 परमाज यांना लोकसेवक श्री. विजय गंगाधर, शिपाई महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, लक्ष्मी मंदीर चौक जवळ सांगली यांची भेट घेणेकामी रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. निखील आठवले व पंच नं.1 परमाज हे त्यांचेकडील टीव्हीएस ज्युपीटर मो.सा. क्र. एमएच 10 सीपी 6499 वरून

रवाना झालेत. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पोलीस उप अधीक्षक यास्मीन इनामदार, पंच नं.2 शशिकांत कुंभार व सापळा अंमलदार पोना/चौगुले, पोकॉ पाटील असे आमचेकडील शासकीय बोलेरो वाहनामधून रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांचेकडील मो.सा. वरून शासकीय विश्रामगृह, विश्रामबाग येथुन सहयाद्रीनगर रेल्वे ब्रीज, मंगळवार बाजार मार्गे लक्ष्मी मंदीरकडे जाणारे रोडने घेतली. मी दिले सुचनेप्रमाणे चालक रजपूत यांनी आमचेकडील शासकीय वाहन तक्रारदार यांचे पाठोपाठ घेतली. तक्रारदार यांनी त्यांचेकडील मो.सा. लक्ष्मी मंदीर चौक जवळ एका इमारतीचे भिंतीवर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय असा फलक असलेल्या इमारतीजवळ पार्किंगमध्ये पार्क करून तक्रारदार व पंच नं.1 परमाज पहिल्या मजल्यावरील कार्यालयामध्ये गेलेचे दिसले. लागलीच मी, पंच नं.2 कुंभार व सापळा पथक असे आमचेकडील शासकीय वाहनामध्ये खाली उतरून कार्यालयाचे आजु बाजुस सापळा लावून थांबून राहिलो.

काही वेळाने तक्रारदार श्री. आठवले हे कार्यालयाचे बाहेर येवून त्यांचे डावे खिश्यामधील हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्व नियोजीत इशारा केला.

लागलीच मी दिले सुचनेप्रमाणे पोना/प्रितम चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.09 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर लागलीच माझे सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील मोबाईल वरुन व्हीडीओ शुटींग सुरु केले. लागलीच मी, पंच नं. 2, पोलीस उप अधीक्षक यास्मीन इनामदार, पोना/प्रितम चौगुले, असे कार्यालयामध्ये गेलो. त्यावेळी कार्यालयामध्ये पंच नं.1 परमाज हे तेथे हजर होते. त्यावेळी आम्ही कार्यालयामधील विजय गंगाधर, शिपाई असा भिंतीवर बोर्ड असलेल्या ठिकाणी टेबलवर बसलेल्या इसमाजवळ गेलो. त्यावेळी पंच नं.1 यांनी सदरचे इसम लोकसेवक विजय गंगाधर शिपाई असेलेचे सांगितले. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी लोकसेवक विजय गंगाधर शिपाई यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडले.

त्यावेळी पंच नं.1 परमाज यांनी लोकसेवक विजय गंगाधर शिपाई यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे टेबलचे डावे बाजुचा ड्राव्हर डावे हाताने उघडून उजवे हाताने रक्कम ड्राव्हरमध्ये ठेवली असलेचे सांगितले.

त्यानंतर माझे सुचनेवरून पंच नं.2 शशिकांत कुंभार यांनी लोकसेवक गंगाधर यांचे टेबलचे डावे बाजुचे ड्राव्हरची तपासणी केली असता टेबलच्या डावे बाजुचे ड्राव्हरमध्ये 500/- रूपये दराच्या 2 नोटा असे 1,000/- रूपये मिळून आले.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पंच नं.2 श्री कुंभार यांनी सदर लाच रक्कमेची पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. कुंभार यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक विजय गंगाधर यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर मी लोकसेवक श्री विजय गंगाधर यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विजय यशवंत गंगाधर, वय -48 वर्षे, व्यवसाय - नोकरी ( शिपाई- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, सांगली) रा. मु. पो. साखराळे, ता. वाळवा जि. सांगली, वर्ग- मो.नं. 8788003485 असे असल्याचे सांगीतले. तसेच आम्ही लोकसेवक श्री. विजय गंगाधर यास त्याचे कामाचे स्वरूप विचारता त्याने या कार्यालयात शिपाई पदावर नियुक्तीस आहे. तसेच कार्यालयातील सहाय्यक श्रीमती वैशाली पवार यांना त्यांचे कार्यालयातील कामात मदत करत असतो. सदर कागदपत्रे ही त्यांचे ताब्यात कशी आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी श्रीमती वैशाली पवार, सहाय्यक यांनी कामाची कागदपत्रे व फाईल मागीतली असता त्यांना मी नेउन देतो. तसेच म्हाडा कडील ना हरकत प्रमाणपत्रावर सहायक यांची सही झालेवर ग्राहकांना ती देण्याचे कामकाज मी पहातो.

सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या आहेत. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सॅमसंग मोबाईलमध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.आठवले यांचे ना हरकत प्रमाणपत्राचे अर्जाचे अनुषंगाने कार्यालयातील आवश्यक कागदपत्रे व नोंदवही लोकसेवक श्री.गंगाधर शिपाई यांचेकरवी ताबेत घेतली. यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक असे लोकसेवक श्री.गंगाधर शिपाई यांना ताबेत घेवून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, लक्ष्मी मंदीर चौक जवळ सांगली येथून 13.15 वा चे सुमारास रवाना होवून अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे 13.30 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. परमाज यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार श्री आठवले असे मोटारसायकल वरून महाराष्ट्र

गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, लक्ष्मी मंदीर चौक जवळ सांगली येथे जावून मो.सा. पार्क करून आम्ही पहिल्या मजल्यावरील कार्यालया मध्ये जावून लोकसेवक गंगाधर शिपाई यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचेमध्ये तक्रारदार यांचे एन.ओ.सी. संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक श्री.गंगाधर यांनी तक्रारदार यांना त्यांचे प्रलंबित कामाची एन.ओ.सी. दिली. त्यावेळी लोकसेवक श्री. गंगाधर शिपाई यांनी हाताने इशारा करून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याने तक्रारदार आठवले यांनी त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये अँथ्रॉसीन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढून शिपाई गंगाधर यांचेसमोर धरून "मोजून घ्या की किती हाय बघा." असे म्हणाले असता. शिपाई गंगाधर यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून "आसुदे काय झालं" असे म्हणून लाच रक्कम त्यांचे टेबलचे डावे बाजुचा ड्राव्हर डावे हाताने उघडून उजवे हाताने रक्कम ड्राव्हरमध्ये ठेवली" त्यानंतर तक्रारदार आठवले हे कार्यालयाचे बाहेर गेले" वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री.आठवले यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 परमाज यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 15.10.2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. विजय गंगाधर, शिपाई यांनी पंचासमक्ष महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, सांगली येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार श्री. निखील आठवले यांनी खरेदी केलेल्या म्हाडाचे घराचे लाईट व पाणी कनेक्शनची ना हरकत प्रमाणपत्र देणेसाठी स्वत: करीता तक्रारदार श्री. आठवले यांचेकडे 1,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. तसेच दि.15.10.2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. विजय गंगाधर, शिपाई यांनी पंचासमक्ष महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, सांगली येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम 1,000/- रूपये स्विकारली आहे. म्हणून माझी आरोपी लोकसेवक श्री. विजय यशवंत गंगाधर, वय -48 वर्षे, व्यवसाय - नोकरी ( शिपाई - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणेगृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, उपविभागीय कार्यालय, सांगली) रा. मु. पो. साखराळे, ता. वाळवा जि. सांगली, वर्ग- 4 यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):
umesh madhukar chikane
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402UM
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRADIP BALASO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPPBSM7901

mane